# The Tolls on Roads and Bridges Act, 1875

(BOMBAY 3 OF 1875)

# रस्तें व पूल यांवरील दस्तुरीबाबत अधिनियम, १८७५

## अनुक्रमणिका.

प्रस्तावना.


| कलमें— | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | सन १८५१ चा अधिनियम ८ रद्द करणें ... ... ... ... | ३३३ |
| २. | [रद्द करण्यांत आले] ... ... ... ... ... ... | ३३३ |
| ३. | बसविण्यांत येणाऱ्या दस्तुरीचा दर, ... ... ... ... ... | ३३३ |
| | "इसमांची व्याख्या" ... ... ... ... ... ... | ३३३ |
| ४. | दस्तुरी न दिल्याचे बाबतींत कार्यरीति ... ... ... ... | ३३४ |
| ५. | दस्तुरी देण्याबाबत माफी. राज्य सरकारास इतर माफी मंजूर करण्याचा अधिकार आहे. | ३३४ |
| ६. | पोलिस अधिकाऱ्यांनी दस्तुरी वसूल करणाऱ्यांस साहाय्य केले पाहिजे ... | ३३४ |
| ७. | दस्तुरी मागणाऱ्या अनधिकृत इसमांस आणि अवैध मागणीबद्दल शास्ती ... | ३३४ |
| ८. | दरवाज्याजवळ किंवा स्टेशनाजवळ दस्तुरीचे कोष्टक लावणें ... ... | ३३५ |
| ९. | दस्तुरी वसूल करणाऱ्या इसमास दस्तुरीबाबत तडजोड करण्याचा अधिकार ... | ३३५ |
| १०. | दस्तुरी बसविण्याचें काम मक्त्यानें देण्याचा राज्य सरकारचा अधिकार ... | ३३५ |
| ११. | मक्तेदार किंवा त्याचा अभिकर्ता यांची कामें ... ... ... ... | ३३५ |
| १२. | [रद्द करण्यांत आले] ... ... ... ... ... | ३३५ |
| | अनुसूचि. | |

# सन १८७५ चा मुंबई अधिनियम ३ *

## [रस्ते व पूल यांवरील दस्तुरीबाबत अधिनियम, १८७५]

[२८ डिसेंबर १८७५]

हा अधिनियम पुढील अधिनियमाअन्वयें अंशतः रद्द करण्यांत आला आहे :—

सन १८९५ चा अधिनियम १६ ;

सन १९०१ चा अधिनियम २ ;

सन १८८६ चा मुंबई अधिनियम ३ ;

सन १८८४ चा मुबई अधिनियम १ (मुंबई शहर खेरीजकरुन).

ह्या अधिनियमांत पुढील आदेश व अधिनियम याअन्वयें अनुकूलन, रुपभेद व सुधारणा करण्यांत आल्या आहेत :—

सन १८८१ चा मुंबई अधिनियम ५ ;

सन १८८४ चा मुंबई अधिनियम १ (मुंबई शहर खेरीजकरून).

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.

मुंबई इलाख्यांतील सार्वजनिक रस्ते व पूल यांवर दस्तुरी बसविण्यांत सरकारला अधिकार देणारा अधिनियम.

ज्याअर्थी, सन १८६४ चा अधिनियम १५ यांस अनुसरून मुंबई इलाख्यांत तारीख ३० जुलै १८६४ पासून दस्तुऱ्या बसविण्यांत आल्या आहेत परंतु उक्त अधिनियम उक्त इलाख्यास यथानियम लागू केला आहे किंवा कसें याबद्दल शंका निर्माण झाल्या आहेत ; आणि त्याअर्थी उक्त शंका दूर करणें आणि उक्त इलाख्यांतील सार्वजनिक रस्तें व पूल यांवर दस्तुरी बसविण्याबाबतचे उपबंध एका अधिनियमांत एकत्रित करणें इष्ट आहे ; त्याअर्थी पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :— प्रस्तावना.

१. सन १८५१ चा अधिनियम ८ हा तो जेथवर मुंबई इलाख्यास लागू आहे तेथवर, याअन्वयें रद्द करण्यांत आला आहे. सन १८५१ चा अधिनियम ८ रद्द करणें.

२. [सन १८६४ चा अधिनियम १५ हा ३० जुलै १८६४ पासून मुंबई इलाख्यास लागू केला असल्याचे समजणें.] हे कलम सन १८९५ चा अधिनियम १६ याअन्वयें रद्द करण्यांत आले.

३. राज्य सरकारास, बादशहाचे खर्चानें किंवा सन १८६९ चा मुंबई अधिनियम ३ च्या उपबंधाअन्वयें जमा केलेल्या निधींतून किंवा राज्य सरकारच्या सामान्य नियंत्रणाच्या अधीन असलेले आणि प्राधिकारान्वयें बसविण्यांत आलेल्या इतर निधींतून जे रस्ते किंवा पूल केले असतील किंवा यानंतर करण्यांत येतील किंवा दुरुस्त केले जातील असें रस्तें किंवा पूल यांवर, ह्या अधिनियमास जोडलेल्या अनुसूचित निर्दिष्ट केलेल्या दरांहून अधिक नसेल अशा दरानें दस्तुऱ्या बसविण्याचा अधिकार आहे आणि त्यास योग्य वाटेल अशा इसमाच्या व्यवस्थेखाली अशा जमा केलेल्या दस्तुऱ्या देण्याचा अधिकार आहे ; आणि अशा दस्तुऱ्या जमा करण्याच्या व त्यांची व्यवस्था पाहण्याच्या कामांसाठीं नेमलेले सर्व इसम हें, जर त्यांना जमीन महसूल वसूल करण्याच्या कामी नेमले असते तर त्यांचेवर जी जबाबदारी पडली असती त्याच जबाबदारीस ते पात्र असतील. बसविण्यांत येणाऱ्या दस्तुरीचा दर.

*दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला.

"इसमांची" व्याख्या.

कंडिका २.––ह्या कलमांतील "इसम" या शद्बांत, मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १८८४, अन्वयें स्थापन केलेल्या स्थानिक मंडळांचा त्यांत समावेश होतो असें समजलें पाहिजे.

दस्तुरी न दिल्याचे बाबतींत कार्यरीति.

४. मागणी केल्यानंतर अशी कोणतीहि दस्तुरी न दिल्याचे बाबतींत, ती वसूल करण्यासाठीं नेमलेल्या अधिकाऱ्यांस प्रथमतः, ज्या वाहनांवर किंवा जनावरांवर दस्तुरी आकारावयाची आहे अशा वाहनांवरील किंवा जनावरांवरील ओझ्याचा किंवा मालाचा, दस्तुरी भागविण्यास पुरेशा किंमतीचा, कोणताहि भाग धरण्याचा अधिकार आहे किंवा ओझें किंवा माल अपुरा पडल्याचे बाबतींत, असें वाहन किंवा जनावर धरण्याचा अधिकार आहे ; आणि, जर कोणतीहि दस्तुरी ही अशा रीतीनें धरण्याबद्दल जो खर्च आला असेल त्या खर्चासहित चोवीस तासांत दिली गेली नाहीं तर ती बाब, उक्त दस्तुरी वसूल करण्याच्या कामावर अधीक्षण करण्यास नेमलेल्या अधिकाऱ्यासमोर आणली पाहिजे व त्यास, दस्तुरी देण्यासाठीं व ती न दिल्यामुळें, किंवा मालमत्ता धरण्यांत व विक्री करण्यांत आलेला खर्च भागविण्यासाठीं धरलेली मालमत्ता विकण्याचा अधिकार आहे आणि जी परत करावयाची राहिली असेल अशी शिल्लक रक्कम ही, मालमत्तेच्या मालकानें मागणी केल्यानंतर त्यास परत देवविली पाहिजे ; उक्त अधिकाऱ्यानें मालमत्ता मिळाल्यानंतर, तात्काळ एक नोटीस काढली पाहिजे ; आणि अशा नोटिशींत रविवार किंवा कोणतीहि जवळची सुट्टी खेरीजकरून, दुसऱ्या दिवशीं दुपारी तो ती मालमत्ता लिलांव करून विकणार आहे असें निर्दिष्ट केले पाहिजे :

परंतु, जर विक्रीस प्रत्यक्ष सुरुवात होण्यापूर्वी कोणत्याहि वेळीं, ज्या इसमाची मालमत्ता धरण्यांत आली आहे अशा इसमानें, झालेल्या सर्व खर्चाची रक्कम आणि त्यास जी दस्तुरी देणें आहे त्या दस्तुरीच्या दुप्पटीएवढी रक्कम दिली तर उक्त अधिकाऱ्यानें धरलेली मालमत्ता तात्काळ मुक्त केली पाहिजे.

दस्तुरी देण्यास माफी. राज्य सरकारास इतर माफी मंजूर करण्याचा अधिकार आहे.

५. कामावर असलेले पोलिस अधिकारी किंवा त्यांच्या अभिरक्षेंतील कोणताहि इसम किंवा मालमत्ता यांच्या जाण्यायेण्यावर कोणतीहि दस्तुरी दिली जाणार नाहीं. आणि राज्य सरकारनें, राजपत्रांतील अधिसूचनेंद्वारें ह्या अधिनियमाअन्वयें बसविण्यांत आलेल्या दस्तुऱ्या देण्यामध्यें इतर माफी मंजूर करणें व त्यांची व्याख्या करणें हे विधिसंमत असेल.

पोलिस अधिकाऱ्यांनीं दस्तुरी वसूल करणाऱ्यांस साहाय्य केले पाहिजे.

६. ह्या अधिनियमाची अमलबजावणी करतांना आवश्यकता असेल त्यावेळीं सर्व पोलिस अधिकाऱ्यांनीं दस्तुरी वसूल करणाऱ्यांस साहाय्य दिले पाहिजे आणि उक्त कारणांसाठीं त्यांना त्यांची सामान्य पोलिसाची कर्तव्यें करण्यासाठीं जे अधिकार आहेत तेंच अधिकार असतील.

दस्तुरी मागणाऱ्या अनधिकृत इसमास आणि अवैध मागणीबद्दल शास्ति.

७. ह्या अधिनियमान्वयें दस्तुरी वसूल करण्यासाठीं नेमण्यांत आलेल्या इसमाखेरीजकरुन जो कोणताहि इसम, कोणत्याहि सार्वजनिक रस्त्यांवर किंवा पुलांवर किंवा त्यांवर वसलेल्या कोणत्याहि बाजारांतून जाण्यासाठीं कोणतीहि दस्तुरी बसविल किंवा मागेल असा प्रत्येक इसम आणि जो कोणताहि इसम वैधरीत्या ठरविलेल्या दस्तुरीपेक्षां अधिक किंवा इतर कोणतीहि दस्तुरी अवैधरीत्या आणि बळजबरीनें मागील किंवा घेईल किंवा कोणतीहि मालमत्ता धरणें किंवा ती विकणें हें विधिसंमत नव्हे असें माहित असूनहि कोणतीहि मालमत्ता धरील किंवा विकेल किंवा ह्या अधिनियमाप्रमाणें असल्याचे भासवून कोणत्याहि इसमाकडून पैसे किंवा कोणतीहि मौल्यवान वस्तू अवैध अशा कोणत्याहि रीतीनें बळजबरीनें घेईल असा प्रत्येक इसम, फौजदारी न्यायाधिशासमोर, त्यास दोषी ठरविण्यांत आले असतां पराकाष्टा सहा महिने मुदतीच्या कैदेच्या शिक्षेस किंवा पराकाष्टा दोनशे रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल आणि फौजदारी न्याया-

भिशास अशा दंडाच्या कोणताहि भाग, आपल्यावर अन्याय झाला आहे असें समजणाऱ्या इसमास देण्याचा अधिकार आहे; परंतु ह्या उपाययोजनेंमुळें त्यास जिल्ह्याच्या दिवाणी न्यायालयांत दावा दाखल करून आपल्या हक्काची भरपाई करुन घेण्याच्या हक्कास प्रतिबंध होतो किंवा अशा हक्कावर परिणाम होतो असें समजतां कामा नये.

८. कोणत्याहि दस्तुरी घेण्याच्या दरवाज्याजवळ किंवा स्टेशनाजवळ जी दस्तुरी घेण्याचा अधिकार देण्यांत आला आहे अशा दस्तुरीचे कोष्टक, सुवाच्य अक्षरांत इंग्रजी भाषेंत व जिल्ह्याच्या देशी भाषेंत लिहून किंवा छापून व दस्तुरी न दिल्याबद्दल किंवा कोणतीहि अवैध दस्तुरी घेतल्याबद्दल जी शास्ति देण्यांत यईल त्या शास्तीचे पत्रक तशाच रीतीनें लिहून किंवा छापून त्यास जोडून तें, सरकारीनें दस्तुरी-वसल करणाऱ्या इसमास दिले पाहिजे आणि तें त्यानें अशा दरवाज्याजवळ किंवा स्टेशनाजवळ ठळक जागीं ठेवले पाहिजे. दरवाज्या-जवळ किंवा स्टेशनाजवळ दस्तुरीचे कोष्टक लावणें.

९. ह्या अधिनियमाअन्वयें दस्तुरी वसूल करण्याची व्यवस्था ज्या इसमाकडे सोंपविण्यांत आलीं असेल अशा कोणत्याहि इसमास, त्याच्या स्वविवेकानुसार ज्या इसमास स्वतःबद्दल किंवा त्याने ठेवलेल्या कोणत्याहि वाहनाबद्दल किंवा वहनाबद्दल तो जी कोणताहि विवक्षित रक्कम देणें असेल त्या रकमेसाठीं अशा कोणत्याहि इसमाबरोबर, ह्या अधिनियमांस जोडलेल्या अनुसूचिमध्यें निर्दिष्ट केलेल्या दस्तुरीच्या दराचे ऐवजीं, एक वर्षाहून अधिक नसेल अशा मुदतीपर्यंत तडजोड करण्याचा अधिकार आहे. दस्तुरी वसूल करणाऱ्या इसमास दस्तुरीबाबत तडजोड करण्याचा अधिकार.

१०. राज्य सरकारनें, कोणत्याहि सार्वजनिक रस्ता किंवा पूल यांवर ह्या अधिनियमास जोडलेल्या अनुसूचिमध्यें निर्दिष्ट केलेल्या दरांहून अधिक नसेल अशा दरानें दस्तुरी बसविण्याचें काम हें, दरवर्षी किंवा राज्य सरकारास योग्य वाटेल अशा शर्ती व अटींवर, सात वर्षांहून अधिक नसेल अशा अधिक मुदती-साठीं, सार्वजनिक लिलांव किंवा खासगी करार करून, मक्तयानें देणें हें विधिसंमत असेल : दस्तुरी बसविण्याचें काम मक्त्यानें देण्याचा प्रांतिक सरकारचा अधिकार.

परंतु मक्तेदारानें अशा शर्तींची योग्य पूर्तता करण्याबद्दल तारण दिले पाहिजे आणि मक्तयांतील अटी व शर्ती अन्वयें देणे असतील अशा सर्व रकमा ह्या, त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या विधिअन्वयें तो, ज्या मर्यादेपर्यंत लागू करतां येईल त्या मर्यादेपर्यंत, जमीनमहसुलाबद्दलची मागणी असल्याप्रमाणें, वसूल करतां येतील.

११. जेव्हां कोणत्याहि सार्वजनिक रस्त्यावरील दस्तुरी वसूल करण्याचे काम हें योग्यरित्या मक्त्यानें देण्यांत येईल तेव्हां, मक्तेदार आणि त्यानें अभिकर्त्ता म्हणून ज्यास नेमले असेल असा प्रत्येक इसम हे ह्या अधिनियमान्वयें दस्तुरी वसूल करण्यासाठीं नेमलेले इसम आहेत असें समजण्यांत आले पाहिजे आणि ह्या अधिनियमाअन्वयें दस्तुरी वसूल करण्यासाठीं नेमलेला इसम यांना जे अधिकार देण्यांत आले आहेत ते सर्व अधिकार त्यांना चालवितां येतील व असे इसम ज्या जबाबदाऱ्यांस अधीन आहेत, त्याच जबाबदाऱ्यास मक्तदार व त्यानें अभिकर्ता म्हणून नेमलेला इसम अधीन असतील. मक्तेदार किंवा त्याचा अभिकर्ता यांची कामें.

१२. (दस्तुरी लागू करणें) हे कलम सन १८८४ चा मुंबई अधिनियम १ या अन्वयें रद्द करण्यांत आले.

# अनुसूचि

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| स्प्रींग्ज असलेल्या प्रत्येक चार चाकी वाहनांवर ... ... .... ... | १ | ० | ० |
| स्प्रींग्ज असलेल्या प्रत्येक दुचाकी वाहनांवर ... ... ... ... | ० | ८ | ० |
| स्प्रींगज असलेल्या प्रत्येक एक्क्यावर किंवा हातगाडीवर ... ... ... | ० | २ | ० |
| ८ बैल, रेडे, घोडें, तट्टू, गाढव किंवा खेचर यांनी ओढलेल्या, स्प्रिग्ज नसलेल्या प्रत्येक गाडीवर व हातगाडीवर, जर त्यावर ओझें असेल तर. | १ | ० | ० |
| ८ बैल, रेडें, घोडें, तट्टू, गाढव किंवा खेचर यांनी ओढलेल्या, स्प्रिग्ज नसलेल्या प्रत्येक गाडीवर व हातगाडीवर, जर त्यावर ओझें नसेल तर. | ० | ८ | ० |
| ६ बैल, रेडें, घोडें, तट्टू, गाढव किंवा खेचर यांनी ओढलेल्या, स्प्रिग्ज नसलेल्या प्रत्येक गाडीवर व हातगाडीवर, जर त्यावर ओझें असेल तर. | ० | १२ | ० |
| ६ बैल, रेडें, घोडें,तट्टू, गाढव किंवा खेचर यांनी ओढलेल्या, स्प्रिग्ज् नसलेल्या प्रत्येक गाडीवर व हातगाडीवर, जर त्यावर ओझें नसेल तर. | ० | ६ | ० |
| ४ बैल, रेडे, घोडें, तट्टू, गाढव किंवा खेंचर यांनी ओढलेल्या, स्प्रिगज नसलेल्या प्रत्येक गाडीवर व हातगाडीवर, जर त्यांवर ओझें असेल तर ... ... ... | ० | ८ | ० |
| ४ बैल, रेडें, घोडें, तट्टू, गाढव किंवा खेचर यांनी ओढलेल्या, स्प्रिग्ज नसलेल्या प्रत्येक गाडीवर व हातगाडीवर, जर त्यांवर ओझें नसेल तर ... ... ... ... | ० | ४ | ० |
| २ बैल, रेडें, घोडें, तट्टू, गाढव किंवा खेंचर यांनी ओढलेल्या, स्प्रिग्ज नसलेल्या प्रत्येक गाडीवर व हातगाडीवर, जर त्यावर ओझें असेल तर. | ० | ४ | ० |
| २ बैल, रेडें, घोडें, तट्टू, गाढव किंवा खेंचर यांनी ओढलेल्या, स्प्रिग्ज नसलेल्या प्रत्येक गाडीवर व हातगाडीवर, जर त्यावर ओझें नसेल तर. | ० | २ | ० |
| प्रत्येक रेडयावर किंवा बैलावर, जर त्यावर आझें असेल तर ... ... ... | ० | १ | ० |
| प्रत्येक रेडयावर किंवा बैलावर, जर त्यावर ओझें नसेल तर .... ... ... | ० | ० | ६ |
| प्रत्येक हत्तीवर ... ... ... ... ... ... | १ | ८ | ० |
| प्रत्येक उंटावर, जर त्यांवर ओझे असेल तर ... ... ... ... | ० | ४ | ० |
| प्रत्येक उंटावर, जर त्यांवर ओझे नसेल तर ... ... ... ... | ० | २ | ० |
| प्रत्येक घोडयावर, जर त्यांवर ओझें असेल किंवा त्यावर सवारी असेल तर ... | ० | १ | ६ |
| प्रत्येक घोडयावर, जर त्यांवर ओझें नसेल किंवा तो नेला जात असेल तर... ... | ० | ० | ९ |
| प्रत्येक तट्टू किंवा खेंचर, जर त्यांवर ओझें असेल किंवा त्यावर सवारी असेल ... | ० | ० | ९ |
| प्रत्येक तट्टू किंवा खेंचर, त्यांवर ओझें नसेल किंवा तें नेलें जात असेल ... ... | ० | ० | ६ |
| प्रत्येक गाढवांवर, जर त्यांवर ओझें असेल किंवा त्यांवर सवारी असेल तर ... ... | ० | ० | ६ |
| प्रत्येक गाढवांवर, जर त्यांवर ओझें नसेल किंवा ते नेले जात असेल तर ... ... | ० | ० | ३ |
| प्रत्येक शेळी किंवा मेंढी किंवा डुक्कर यांवर ... ... ... ... | ० | ० | ९ |
| आठ इसमांनी उचलण्याची प्रत्येक पालखी, डोली, पाळणा किंवा टोंजोंन (Tonjon) | १ | ० | ० |

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| सहा इसमांनी उचलण्याची पालखी, डोली, पाळणा किंवा टोंजोंन (Tonjon) ... | ० | १२ | ० |
| चार इसमांनीं उचलण्याची पालखी, डोली, पाळणा किंवा टोंजोंन (Tonjon) ... | ० | ८ | ० |
| पूल किंवा टेकडीवरील रस्ता यांवर पायी जाणाऱ्या येण्याऱ्या प्रत्येक इसमांवर सरकारची खास मंज़ूरी घेऊन. | ० | ० | ३ |

**स्पष्टीकरण १.––ज्या वाहनांवर दस्तुरी मागण्यांत येऊं शकेल असें कोणतेहि वाहन ओढणाऱ्या जनावरांवर दस्तुरी आकारतां कामा नये.**

**स्पष्टीकरण २.––त्याच दिवशीं परतणाऱ्या त्याच वाहनांवर किंवा जनावरांवर दुसऱ्यांदा कोणतीहि दस्तुरी बसवितां कामा नये.**